# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 13 April 2025

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १३ एप्रिल २०२५ सायंकाळी ६.१०**

****

- भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त सर्वत्र विशेष पदयात्रांचं आयोजन
- डिसेंबर २०२६ पर्यंत राज्यातल्या ८० टक्के शेतकऱ्यांना वर्षभर १२ तास मोफत वीज उपलब्ध करुन देण्याची मुख्यमंत्र्यांची ग्वाही
- राज्यातल्या पहिल्या हरित ऊर्जा निर्मिती करणाऱ्या परभणी इथल्या महावितरण कार्यालयाचं उद्घाटन

आणि

- परळी वैजनाथ रेल्वे स्थानकाच्या पुनर्विकासासाठी २५ कोटी सात लाख रुपये निधी मंजूर

****

भारतरत्न डॉ बाबासाहेब आंबेडकर यांची १३४ वी जयंती उद्या साजरी होत आहे. यानिमित्त आज राज्यासह देशभरात विविध ठिकाणी पदयात्रा काढण्यात आली. केंद्रीय युवा व्यवहार आणि क्रीडा मंत्री डॉ. मनसुख मांडविया यांनी बिहारमध्ये पटना इथं गांधी मैदानापासून सुरु होणाऱ्या पदयात्रेला हिरवा झेंडा दाखवला.

युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे आज मुंबईत भीम पदयात्रेत सहभागी झाल्या. नरिमन पॉइंट पासून मंत्रालयात आंबेडकर पुतळ्यापर्यंत ही पदयात्रा काढण्यात आली. यावेळी पदयात्रेत हजारो संख्येनं तरुण सहभागी झाले होते. यावेळी रक्षा खडसे म्हणाल्या..

**बाईट – युवा व्यवहार आणि क्रीडा राज्यमंत्री रक्षा खडसे**

****

राज्यात आज सकाळी जिल्हा प्रशासनाच्यावतीनं जय भीम पदयात्रा काढण्यात आली.

धाराशिव इथं पोलिस अधीक्षक संजय जाधव यांच्या हस्ते डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून पदयात्रेला सुरुवात झाली. यावेळी राष्ट्रगीत, राज्यगीत आणि भारतीय संविधानाच्या उद्देशिकेचं वाचन करण्यात आलं. या पदयात्रेत शालेय तसंच महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसह कर्मचारी सहभागी झाले होते. पदयात्रेच्या मार्गावर फुले-शाहू-आंबेडकर उद्यान कृती समितीच्यावतीनं विविध महापुरुषांचे देखावे उभारण्यात आले होते.

परभणी इथं काढण्यात आलेल्या पदयात्रेत जिल्हाधिकारी रघुनाथ गावडे, परभणी महानगरपालिकेचे आयुक्त धैर्यशील जाधव उपस्थित होते. महात्मा फुले पुतळा ते बाबासाहेब आंबेडकर पुतळ्यापर्यंत ही पदयात्रा काढण्यात आली. विविध शाळा, महाविद्यालयांतले विद्यार्थी, खेळाडू आणि नागरिक मोठ्या संख्येनं यावेळी उपस्थित होते.

दरम्यान, परभणी शहरात जिल्हाधिकारी कार्यालयासमोरील डॉ बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला अभिवादन करण्यासाठी येणाऱ्या अनुयायांसाठी वाहतुकीत बदल करण्यात आले आहेत. नागरीकांनी त्याची नोंद घेण्याचं आवाहन प्रशासनाने केलं आहे.

जालना शहरात नूतन वसाहतीतून मस्तगडपर्यंत जय भीम पदयात्रा काढण्यात आली.

****

डॉ. बाबसाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त राज्यभरात विविध कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

छत्रपती संभाजीनगर शहरात विविध संस्था, संघटना, राजकीय पक्षांच्या वतीने आंबेडकर यांच्या पुतळ्यास अभिवादन करण्यात येणार आहे. विविध ठिकाणी मिरवणूका, अभिवादन, व्याख्यानं, रक्तदान शिबिर, भीम गीतांचे कार्यक्रम होणार असून, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातल्या पुतळ्यास अभिवादन, रॅली, मिरवणूक देखील काढण्यात येणार आहेत. या पार्श्वभूमीवर शहरात मोठा पोलिस बंदोबस्त तैनात करण्यात येणार आहे. मिरवणुकीचा मार्ग क्रांती चौक - भडकल गेट मार्गे पैठण गेट - गुलमंडी - सिटी चौक - मुख्य पोस्ट कार्यालय असा असेल, त्यामुळे उद्या सकाळी १० ते रात्री १० वाजेपर्यंत हे रस्ते

वाहतूकीसाठी बंद राहणार असून, नागरिकांनी पर्यायी मागार्चा वापर करण्याचं आवाहन प्रशासनानं केलं आहे.
छत्रपती संभाजीनगर महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ ललित कला भवन उस्मानपुरा यांच्या वतीनं उद्या आंबेडकर जयंतीनिमित्त विजयकुमार पांचाळ यांचं व्याख्यान होणार आहे.

नांदेड जिल्हा परिषदेच्या वतीने देखील आंबेडकर जयंतीनिमित्त अभिवादन, पाणी वाटप, भीमगीत गायन आदी कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं आहे.

****

आंबेडकर यांच्या जयंती दिनानिमित्त माहिती आणि जनसंपर्क महासंचालनालयाच्या समाजमाध्यमांवरून, 'महापुरुष डॉक्टर आंबेडकर' या माहितीपटाचं प्रसारण उद्या सकाळी ११ वाजता आणि 'डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर : द अनटोल्ड ट्रूथ' या चित्रपटाचं प्रसारण दुपारी १ वाजता होणार आहे. यानंतर अर्ध्या तासानं दुपारी दिड वाजता याच चित्रपटाचं प्रसारण दुरदर्शनच्या सह्याद्री वाहिनीवरुनही होणार आहे.

****

डिसेंबर २०२६ पर्यंत राज्यातल्या ८० टक्के शेतकऱ्यांना वर्षभर १२ तास मोफत वीज उपलब्ध करुन देण्यात येईल, अशी ग्वाही मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिली. वर्धा जिल्ह्यात आर्वी इथं आज विविध विकासकामांचं लोकार्पण केल्यानंतर ते बोलत होते. राज्य शासनाने शेतकऱ्यांच्या हिताचे विविध निर्णय घेऊन प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु केल्याचं फडणवीस म्हणाले.

**बाईट – मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस**

येत्या पाच वर्षात राज्यात सामान्य नागरिकांचं वीज बील दरवर्षी कमी होणार, तसंच ३०० युनीट पर्यंत वीज वापरणाऱ्या मध्यमवर्गीय आणि गरीब कुटुंबांना सौर ऊर्जेअंतर्गत आणून मोफत वीज देण्यात येईल, असंही मुख्यमंत्र्यांनी यावेळी सांगितलं. भूजल पातळी खोल जात असल्यामुळे शेतकऱ्यांना १० अश्वशक्तीचे कृषीपंप वापरण्याची परवानगी देण्यात आल्याचं सांगून त्यांनी, प्रधानमंत्री सूर्यघर योजनेत सहभागी होण्याचं आवाहन राज्यातल्या नागरीकांना केलं.

****

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी जालियनवाला बाग हत्याकांडातील हुतात्म्यांना आदरांजली अर्पण केली आहे. हा आपल्या देशाच्या स्वातंत्र्यपूर्व इतिहासातला एक काळा अध्याय आहे, येणारी प्रत्येक पिढी या बलिदानाचं स्मरण करेल असं, पंतप्रधानांनी आपल्या समाज माध्यमांवरील संदेशात म्हटलं आहे. १३ एप्रिल १९१९ रोजी अमृतसरमधील जलियनवाला बाग इथं अमानुष गोळीबार झाला होता.

****

परभणी इथल्या महावितरण कार्यालयाने राज्यातलं पहिलं हरित ऊर्जा निर्मिती करणं कार्यालय म्हणून मान मिळवला आहे. या कार्यालयात ३५ किलोवॅट सौरऊर्जा निर्मिती केली जाईल. ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर यांच्या हस्ते आज या कार्यालयाचं उद्घाटन झालं. पंतप्रधान सूर्यघर योजनेद्वारे नागरिकांना सौरऊर्जा मिळवण्याची संधी मिळणार असून, शेतकऱ्यांसाठी सौर कृषीपंप योजनेचा लाभ मिळवण्याचं आवाहन बोर्डीकर यांनी यावेळी केलं. त्या म्हणाल्या,

**बाईट – ऊर्जा राज्यमंत्री मेघना बोर्डीकर**

****

बीड जिल्ह्यातल्या परळी वैजनाथ रेल्वे स्थानकाच्या पुनर्विकासासाठी २५ कोटी सात लाख रुपये निधी मंजूर करण्यात आला आहे. राज्यातल्या एकूण १३२ रेल्वे स्थानकांच्या पुनर्विकास कार्यक्रम हाती घेण्यात आला असून, त्यात परळी रेल्वे स्थानकाचा समावेश आहे. याबद्दल आमदार धनंजय मुंडे यांनी रेल्वे मंत्री अश्विनी वैष्णव तसंच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचे आभार मानले. प्रभू वैद्यनाथ ज्योतिर्लिंग देवस्थानाच्या दर्शनास येणाऱ्या भाविकांच्या सोयी–सुविधांसह या भागातलं दळणवळण सोयीस्कर आणि गतिमान होण्यासाठी या निधीचा उपयोग होणार आहे.

****

राज्य सरकारच्या मित्र या संस्थेच्या माध्यमातून राज्यात वेगवेगळे मोठे प्रकल्प सुरू करण्यात येणार असल्याची माहिती, या संस्थेचे उपाध्यक्ष तथा तुळजापूरचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी आज दिली. ते आज धाराशिव इथं पत्रकार परिषदेत बोलत होते. या माध्यमातून धाराशिव जिल्ह्यात शेतकऱ्यांचं उत्पन्न वाढवण्यासाठी अणुऊर्जेवर आधारित अन्नप्रक्रिया प्रकल्प सुरू करण्यासंदर्भात प्रकल्प अहवाल तयार करण्यात येत आहे. यासाठी परदेशी गुंतवणूक आणण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचं आमदार पाटील यांनी सांगितलं.

****

बीड जिल्हा रुग्णालयात आज एका महिलेचा प्रसूतीनंतर तासाभरातच रक्तस्त्रावाने मृत्यू झाला. डॉक्टरांच्या हलगर्जीपणामुळेच महिलेचा मृत्यू झाल्याचा आरोप नातेवाईकांनी केला असून, याप्रकरणी पोलिसात तक्रार दाखल करण्यात आली आहे. उत्तरीय तपासणीनंतर जो अहवाल येईल, त्यानुसार कारवाई करण्यात येईल, असं जिल्हा शल्य चिकित्सक संजय राऊत यांनी सांगितलं.

****

राज्य शिक्षण मंडळाच्या फेब्रुवारी-मार्चमध्ये पार पडलेल्या दहावी आणि बारावी परीक्षेसाठी क्रीडा गुण सवलतीचे प्रस्ताव सादर करण्यासाठी २१ तारखेपर्यंत मुदवाढ देण्यात आली आहे. हे प्रस्ताव जिल्हा क्रीडा अधिकाऱ्यातर्फे आपले सरकार प्रणालीद्वारे ऑनलाईन पद्धतीने सादर करण्याचं आवाहन शिक्षण मंडळानं केलं आहे.

****

बीड जिल्ह्यात सोयाबीन तेलाचा अपहार केल्याप्रकरणी गुन्हा दाखल झाला आहे. लातूरहून तेल घेऊन येणाऱ्या एका टँकर चालकाने, अपघात होऊन तेल सांडून गेलं असा बनाव करत २४ टन सोयाबीन रिफाईन्ड तेलापैकी जवळपास २० टन तेल विक्री करत अपहार केल्याचं उघडकीस आलं. याप्रकरणी या चालकाविरुद्ध परळी ग्रामीण पोलीस ठाण्यास गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

****

राज्यात येत्या २३ तारखेपर्यंत पोषण पंधरवडा साजरा होत आहे. यानिमित्त आज भंडारा जिल्ह्यात आंगणवाडीत कार्यक्रम घेण्यात आला. यात गरोदर मातांनी कोणता आहार घ्यावा, बाळाची काळजी कशी घ्यावी तसंच मासिक पाळी येणाऱ्या मुलींनी कोणती काळजी घेतली पाहिजे याविषयी मार्गदर्शन करण्यात आलं.

****